**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी पूरसदृश परिस्थिती, ७ जणांचा मृत्यू, १ लाख हेक्टर शेतीचं नुकसान

- मुख्यमंत्र्यांकडून परिस्थितीचा आढावा, नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश

- रालोआकडून उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन दिल्लीला रवाना, प्रधानमंत्र्यांची घेतली सदिच्छा भेट

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६७६ अंकांची वाढ

<><><><>

राज्यात अनेक ठिकाणी आज मुसळधार पाऊस पडला. अनेक नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली असून धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यात काही ठिकाणी पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागानं मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे घाट, सातारा घाट, रत्नागिरी, कोल्हापूर घाट या भागांना रेड अलर्ट तर, पालघर, सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागात ऑरेंज अलर्ट दिला आहे. समुद्र खवळलेला असून मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये, अशा सूचना दिल्या आहेत.

**मुंबई** आणि उपनगरात आज सकाळपासून जोरदार पाऊस झाला. सखल भाग जलमय झाले. रेल्वे रुळांवर पाणी भरल्यानं उपनगरीय रेल्वे वाहतूक रखडली. अनेक ठिकाणी पाणी साचल्यानं रस्ते वाहतूकही मंदावली. चेंबूरमध्ये पडझड झाली तर मिठी नदीत एकजण वाहून गेला असल्याची माहिती पालिकेच्या आपत्कालीन विभागानं दिली.

**ठाणे** शहरासह जिल्हाभर कालपासूनच जोरदार पाऊस झाला. जिल्हयातल्या शहापूर, कल्याण, भिवंडी आणि अंबरनाथसह इतर सखल भागात मोठया प्रमाणात पाणी साचलं. पावसामुळं ठाणे महानगरपालिका क्षेत्रातल्या शाळांना उद्या सुटी जाहीर करण्यात

आली आहे. **पालघर** जिल्ह्यातल्या अनेक भागात आज सकाळ पासून जोरदार पाऊस झाला.

**रत्नागिरी**-कोल्हापूर महामार्गावर संगमेश्वर तालुक्यात आंबा घाटात दरड कोसळल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती, दुपारी तीन वाजता वाहतूक सुरू झाली. खेडमधल्या जगबुडी नदीनं, संगमेश्वरातल्या शास्त्री आणि राजापुरातली कोदवली, तर **रायगड** जिल्ह्यात सावित्री, कुंडलिका, आणि अंबा या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात पावसामुळे सखल भागातल्या पुलांवर पाणी आल्यानं काही ठिकाणी वाहतूक ठप्प झाली.

**बुलढाणा** जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांना पूर आला असून हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. नागपूर ते मुंबई महामार्गासह अनेक रस्त्यांवरची वाहतूक ठप्प झाली. चिखली तालुक्यात पुराच्या पाण्यात एक युवक वाहून गेल्यानं त्याचा मृत्यू झाला. अतिवृष्टीमुळे चिखली शहर तसंच ग्रामीण भागातल्या शाळा दोन दिवस बंद राहणार आहेत.

**नांदेड** जिल्ह्यात मुखेड तालुक्यात अतिवृष्टीमुळे लेंडी धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. रावनगाव इथं पुराच्या पाण्यात अडककेल्या २२५ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं.

वारणा धरण पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या पावसामुळे आज सकाळी दहा वाजल्यापासून एकूण ११ हजार ६३० क्युसेक पाणी वारणा नदी पात्रात सोडलं जात आहे. कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे आज रात्री ८ वाजता ३ फुटांवरून ५ फुटापर्यंत उघडून ३३ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग कोयना नदीपात्रात सोडला जाणार आहे.

**बीड** जिल्ह्यात परळी तालुक्यात लिंगी नदीला आलेल्या पुरात चार युवक वाहून गेले. यातल्या तीन जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आलं असून एकाचा मृत्यू झाला.

**अकोला** जिल्ह्यातल्या बार्शीटाकळी तालुक्यातल्या काटेपूर्णा धरणाचे दहाही दरवाजे ६० सेंटिमीटरनं उघडले असून नदीपात्रात आज दुपारपासून ४८० क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**जालना** जिल्ह्यात जोरदार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला आहे. गोदावरी नदीवरील राजाटाकळी, जोगलादेवी आणि मंगरुळ उपसा बंधारे पूर्ण क्षमतेने भरल्यानं तिनही बंधाऱ्यातून पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

**<><><><>**

राज्यात सर्वत्र पावसाचा जोर वाढून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज संपूर्ण राज्यातल्या पावसाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. आणि सर्व यंत्रणांना सतर्क राहायचे निर्देश दिले. गेल्या दोन दिवसांत पावसाशी संबंधित विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती त्यांनी दिली. राज्याच्या विविध भागांमधल्या परिस्थितीची तपशीलवार माहिती देऊन, रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये जास्त पाऊस झाला असून तिथल्या नागरिकांनी पुढचे काही दिवस सतर्क राहावं, असं आवाहन त्यांनी केलं. अतिवृष्टीमुळे राज्याच्या विविध भागांत पिकांच्या झालेल्या नुकसानीबद्दल मुख्यमंत्री म्हणाले…

- **- होल्ड… बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस- - (३० सेकंद)**

- **<><><><>**

सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी मुंबई विमानतळावर बँकॉकहून आलेल्या दोन प्रवाशांकडून अंदाजे साडेआठ कोटी रुपये किंमतीचा साडेआठ किलो गांजा जप्त केला. या दोन्ही प्रवाशांना अटक केली आहे.

**<><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं नाव घोषित झाल्यानंतर ते आज दिल्लीला रवाना झाले. तिथं त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सदीच्छा भेट घेतली.

राधाकृष्णन हे अनुभव समृद्ध असून, विविध पदांवर काम करताना त्यांनी समाजाची सेवा आणि उपेक्षितांना सक्षम बनवण्यावर भर दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही राधाकृष्णन यांच्या उमेदवारीचं स्वागत केलं आहे. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी राज्यपालांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं आहे.

पुढील महिन्याच्या ९ तारखेला उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे.

<><><><>

भारतीय शेअर बाजारात आज आठवड्याच्या सुरुवातीला वाढ पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज ६७६ अंकांनी वधारुन ८१ हजार २७४ अंकांवर बंद झाला. निफ्टी २४६ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ८७७ अंकांवर बंद झाला. सेन्सेक्समध्ये नोंद असलेल्या ३० पैकी २० कंपन्यांचे समभाग आज वधारले. यात तंत्रज्ञान निर्मिती, सिमेंट कंपन्या तसंच, अर्थपुरवठा क्षेत्रात वाढ झाली.

<><><><>

केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना त्यांच्या मतचोरीविषयीच्या वक्तव्याबद्दल सात दिवसांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगितलं आहे. या प्रतिज्ञापत्रासोबत गांधी यांनी पुरावे जोडावेत अन्यथा जाहीर माफी मागावी, असंही आयोगानं म्हटलं आहे. प्रतिज्ञापत्र सादर केलं नाही तर गांधी यांचे आरोप खोटे होते, असं मानलं जाईल, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे. भाजपा नेत्यांनी आयोगाच्या या कारवाईचं स्वागत केलं असून इंडिया आघाडीनं निवडणूक आयोगाचा वापर राजकीय शस्त्र म्हणून केल्याचा आरोप केला आहे.

<><><><>

महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या ५ हजार ३८१ उमेदवारांची आणि संबंधित परिमंडळांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान मूळ कागदपत्रांची आणि प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित कार्यालयांमध्ये करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी महावितरणच्या संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन कार्यालयातर्फे करण्यात आलं आहे.

<><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सिंधुरत्न समृद्ध योजना राबवण्यात येणार आहे. याअंतर्गत येत्या दोन-तीन महिन्यात जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची कॉटेजेस उभारली जातील. या प्रकल्पासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद केल्याची माहिती या योजनेचे अध्यक्ष दीपक केसरकर यांनी दिली. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात ४५ लाभार्थ्यांची निवड करून त्यांना कर्जमंजुरीपत्रं देण्यात आली.

<><><><>

मेजर जनरल विवेक त्यागी यांनी आज राज्यातल्या एनसीसी अर्थात राष्ट्रीय छात्र सेना संचालनालयाच्या अतिरिक्त महासंचालक पदाचा भार स्वीकारला. त्यांना संरक्षण क्षेत्राचा सुमारे ३५ वर्षांचा दांडगा अनुभव आहे. त्यागी यांनी  नुकतंच एनसीसी संचालनालयाचं  मार्गदर्शक संचालक पदही भूषवलं आहे. त्यागी हे अमेरिकेतल्या एसिया पॅसिफिक सेन्टर ऑफ सेक्युरीटी स्टडीजचे संशोधक सदस्यही आहेत.

<><><><>

अनुसूचित जमाती कल्याण समिती उद्यापासून चार दिवस अमरावती जिल्हा दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात समिती चिखलदरा आणि धारणी तालुक्यात दोन दिवस पाहणी करणार आहे. समिती उद्या जिल्ह्यातल्या लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेणार असून जिल्हाधिकारी कार्यालयात नगरपालिका, नगरपरिषद, पोलीस विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, राज्य उत्पादन शुल्क, राज्य परिवहन महामंडळाचा आढावा घेणार आहे.

<><><><>

अहिल्यानगर जिल्ह्यात नेवासा इथं आज पहाटे एका फर्निचर दुकानाला लागलेल्या आगीत एका कुटुंबातल्या पाच जणांचा मृत्यू झाला. तर एक जण जखमी झाला आहे.

नाशिक जिल्ह्यातल्या चांदवड इथंही आज एका खासगी बसला आग लागली. यातून ३९ प्रवासी प्रवास करत होते. यातल्या काही जणांना किरकोळ जखम झाली आहे. मात्र अनेक प्रवाशांचे सामान जळून खाक झालं.

//<><><><>//